नि.दि. दा.क्र. ४०९/२०१९
केशव वि. प्रभावती
नि.क्र. ३५

प्रतिवादी क्र.९ व १० करिता उलट तपास विधीज्ञ श्री. पी. एल. नरहरे यांच्या वतीने शपथेवर पुन्हा सुरू

९. माझ्या आजोबांचे नाव महादबा उर्फ माधवराव शिंदे आहे. महादबा शिंदे यांना दोन पत्नी असून त्यांच्या पहिल्या पत्नीचे अंबुबाई व दुसऱ्या पत्नीचे नाव तुळसाबाई अशी आहेत. महादबा व अंबुबाई यांना दोन मुले नामे व्यंकट व हणमंता व एक मुलगी नामे भागिरथीबाई अशी अपत्ये आहेत. महादबा व तुळसाबाई यांना दोन मुले नामे केशवराव व मनोहरराव अशी अपत्ये आहेत. महादबा यांना मौजे हेळंब येथे व मौजे धनेगांव येथे एकूण ५६ एकर शेती होती. महादबा यांच्या हयातीनंतर ते ५६ एकर क्षेत्र कुटुंबकर्ता व थोरला मुलगा म्हणून व्यंकट यांच्या नावे झाले. महादबा हे सन १९६० ला मयत झाले. महादबा यांच्या हयातीनंतर अंबुबाई व तुळसाबाई यांच्या वारसांमध्ये त्या ५६ एकर क्षेत्राचे वाटप झाले किंवा कसे हे मला माहीत नाही, साक्षीदार स्वत: सांगतात क्षेत्र तोंडी खाण्यासाठी देण्यात आले होते. अंबुबाई व तुळसाबाई यांचे सर्व वारस ते ५६ एकर क्षेत्र विभक्तरित्या वहिवाट करतात. तशी विभक्त वहिवाट मला जसे कळते तशी आहे. माझ्या वयाच्या १० व्या वर्षापासून मला समज आली. सन १९७७ ला आमच्यामध्ये तोंडी वाटप झाले. सन १९७७ पासून सर्वजण आप–आपल्या हिस्सेवारीप्रमाणे ते ५६ एकर क्षेत्र वहिवटतात हे म्हणणे खरे आहे. सन १९७७ नंतर मी स्वत: शेती खरेदी केलेली नाही. सन १९७७ ला आमच्या कुटुंबाच्या अस्तित्वात असणाऱ्या सर्व मिळकतींचे वाटप झालेले नाही. सन १९७७ ला चारही भावांना समान हिस्से वाटप करुन खाण्यासाठी दिले.

केशव आणि श्रीमंत यांचे चुलते–पुतणे असे नाते आहे. केशवराव चलुते असून श्रीमंत हे त्यांचे पुतणे आहेत. सन १९७७ पासून केशव यांच्या कुटुंबाचे सर्व व्यवहार केशवच पाहतात हे म्हणणे खरे आहे. सन १९७७ पासून श्रीमंत यांच्या कुटुंबाचे सर्व व्यवहार श्रीमंत हेच पाहतात हे म्हणणे खरे आहे. केशव व श्रीमंत यांना वाटून आलेल्या मिळकतींमध्ये एकमेकांनी एकमेकांना सन १९७७ पासून हरकत अडथळे केलेले नाहीत हे म्हणणे खरे आहे.

प्रश्न:– सन १९७७ नंतर श्रीमंत यांच्या वडीलांनी ज्या मिळकती खरेदी केल्या त्यामध्ये तुमचा कुठलाही हक्क, अधिकार व हितसंबंध नाही?

उत्तर:– विद्युतपंप बसविण्यासाठी व्यंकटराव व केशवराव यांनी समान हिस्स्याने मिळून व धनेगावचा वीरशेट्टी बिराजदार या सगळ्यांनी मिळून मौजे शिऊर येथील १ हेक्टर क्षेत्र सन १९८१ ला खरेदी केले होते.

१०. सन १९८१ ला खरेदी केलेले व्यंकटराव व वीरशेट्टी बिराजदार यांच्या नावे १ हेक्टर क्षेत्र खरेदी केले होते. ते खरेदीखत मी पाहिलेले आहे. ते खरेदीखत मी दाखल करु शकतो. सन १९८१ ला व्यंकटराव व वीरशेट्टी बिराजदार यांच्या नावे खरेदी केलेल्या १ हेक्टर क्षेत्रात माझा काही हक्क आहे हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही.

११. मौजे धनेगाव उच्चपातळी बंधाऱ्यासाठी व्यंकटराव व वीरशेट्टी बिराजदार यांच्या नावावरील मौजे शिऊर येथील ३३ आर क्षेत्र संपादीत

झाले. त्या संपादीत क्षेत्राचा मावेजा व्यंकटराव व वीरशेट्टी बिराजदार यांनी उचलला किंवा कसे हे मला माहीत नाही, साक्षीदार स्वत: सांगतात त्या मावेजासाठी मी हरकत घेतली आहे. मौजे शिऊर येथील मिळकतीत माझा व माझ्या वडीलांचा काहीही हक्कसंबंध नाही हे म्हणणे खरे नाही. मी खोटा दावा दाखल केला आहे हे म्हणणे खरे नाही. मी खोटा सरतपास दाखल केला आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.11.03 17:44:40 +0530

(रवि वि.पांडे)

दिनांक ०३/११/२०२५. दिवाणी न्यायाधीश, व.स्तर निलंगा,
जिल्हा लातूर